# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 23/11/2022 (बुधवार) सायंकाळ

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. नरखेड :— दिनांक २२/११/२०२२ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मोहदी दळवी रोड ०२ किमी उत्तर या मार्गावर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक २२/११/२०२२ चे ०६.४० वा. ते ०७.२० वा. चे सुमारास मोहदी, दळवी रोड ०२ किमी उत्तर येथे नरखेड पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता यातील बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम. पि./२८ जी.—३५७६ चा चालक आरोपी नामे— मंशाराम ग्यानसिंग मेहदोले, वय ३३ वर्षे, रा. राजना, पोस्ट. उभेगाव ता. जि. छिंदवाडा याने त्याचे ताब्यातील वाहनात तिन म्हशी व दोन रेडयांना पायाला, गळयाला, तोंडाला व शिंगाना दोरी बांधुन त्यांना ईजा पोहचवुन, गुदमरून मरतील अशा प्रकारे वाहतुक करतांना मिळुन आल्याने यातील फिर्यादी व पोलीस स्टेशन नरखेड पोलीस पथकाने पेट्रोलींग दरम्यान सदर वाहनाचा पाठलाग करीत असता यातील वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन सदर वाहनाची पाहणी केली असता, तिन काळया रंगाच्या म्हशी प्रत्येकी किमती १५,०००/—रू. प्रमाणे ४५,०००/—रू. व दोन रेडे प्रत्येकी १०,०००/—रू. प्रमाणे २०,०००/— रूपये व बोलेरो वाहन किमंती ३,००,०००/— रूपये असा एकुण ३,६५,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— सहायक फौजदार श्री. शैलेश डोंगरदिवे, ब.नं. १५९८ पो.स्टे. नरखेड यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ११(१)(ड) प्रा. नि.वा. प्रती. अधि. सहकलम ८३, १७७ मो.वा.का. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस हवालदार गाढवे ब.न. १६८५ पोलीस स्टेशन नरखेड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर